सोमवार दि.०६ मे २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २४९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# भाजपचेच इंजिन बिघडल्यामुळे त्यांना मनसेचे इंजिन सोबत घ्यावे लागले

## शरद पवार-उद्धव ठाकरेंचे इंजिन सुसाट असल्याने ते घाबरले-जयंत पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सातारा (वृत्तसंस्था)**

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे इंजिन सुसाट चालले आहे. त्यामुळे विरोधकांच्या मनात धडकी भरली आहे की आपल्या १० ते १५ तरी जागा निवडून येतात का? भाजपचेच इंजिन बिघडल्यामुळे त्यांना मनसेचे इंजिन सोबत घ्यावे लागले, अशी बोचरी टीका जयंत पाटील यांनी सातारा येथे बोलताना केली आहे.

शशिकांत शिंदे हे संसदेत १०० टक्के हजेरी लावतील. मात्र विरोधात उदयनराजे भोसले हे ५ वर्षात फक्त ६ दिवस संसदेत गेले. लोकसभेत आणि राज्यसभेत आपण ज्यांना निवडून देतो ते जर हजर राहत नसतील, तर ते धक्कादायक आहे. पूर्ण वेळ उपलब्ध असणारा नेता, १०० टक्के हजेरी लावून आणि प्रश्न विचारू शकणारा उमेदवार आम्ही दिला असल्याची खोचक टीका जयंत पाटील यांनी केली आहे.जयंत पाटील म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार हे दुटप्पी भूमिका घेतात अशी टीका सातारा येथे केली होती. त्याला जयंत पाटील यांनी उत्तर देताना सांगितले कि, शरद पवार यांनी कधीही दुटप्पी भूमिका घेतलेली नाही. शाहू महाराजांना उमेदवारी



घ्या म्हणून त्यांच्या मागे आम्ही लागलो होतो. तर उदयनराजेंना मात्र दिल्लीला ताटकळत थांबावे लागले होते. उदयनराजे यांना मी सल्ला दिला असता उभे राहू नका. आधी शशिकांत शिंदे यांचे नाव जाहीर झाल्यानंतर उदयनराजे यांचे नाव जाहीर झाले आहे. त्यामुळे दुटप्पीपणा झालेलाच नाही, असे उत्तर जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या टीकेला दिले आहे.जयंत पाटील म्हणाले की, भाजप सरकार शेतकरीविरोधी असून, जीएसटीच्या माध्यमातून जनतेच्या खिशातील पैसा लुटला जात आहे. भाजपने दहा वर्षांपूर्वी दिलेला शेतकऱ्यांना उत्पन्न दुप्पट करण्याचा शब्दही पाळला नाही. उलट शेतकऱ्यांचे कर्ज दुप्पट झाले असून, उत्पन्न निम्मे झाले आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली.चपलेपासून टोपीपर्यंत सर्व वस्तूंना १२ ते १८ टक्के जीएसटी वसूल केला जातो. शेततळ्यासाठी प्लास्टिक कागद खरेदीसाठी १८ टक्के जीएसटी द्यावा लागतो. घर चालविण्यासाठी ५० हजार रुपये खर्च केले, तर त्यातील नऊ हजार रुपये हे जीएसटीच्या माध्यमातून पुन्हा केंद्र व राज्य सरकारच्या तिजोरीत जातात, असा हिशेबही जयंत पाटील यांनी दिला. भाजपने मराठी माणसांचे दोन पक्ष फोडले. पक्ष फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे, अशी टीकाही केली.

# लोहयात मुखेड जिल्हा न्यायालयाचे अधीक्षक आनंदराव क्षीरसागर सेवापूर्ती सोहळा व शर्करा तुला कार्यक्रम संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा येथील श्रीनिवास मंगल कार्यालयात मुखेड जिल्हा न्यायालयाचे अधीक्षक आनंदराव माधवराव क्षीरसागर यांचा सेवापूर्ती सोहळा व शर्करा तुला कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी लोहा न.पा.चे मा.नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, मा.नगरसेविका सौ. गोदावरीताई गजानन सुर्यवंशी,माजी उपनगराध्यक्ष राम सुर्यवंशी, माजी नगरसेविका सौ. शोभाताई बगडे,लक्ष्मीनारायण कल्याणराव सुर्यवंशी, माजी नगराध्यक्ष किरण वटमवार , डॉ.डी.बी. कानवटे,माजी नगरसेवक युवराज वाघमारे, आनंदराव क्षीरसागर यांच्या पत्नी सौ. पद्मीन आनंदराव क्षीरसागर, मुलगा



आकाश आनंदराव क्षीरसागर, सुन सौ. दुर्गा आकाश क्षीरसागर,मुलगी सौ.पुजा स्वप्नील कंधारकर, तेली समाज संस्थेचे जिल्हाध्यक्ष बालाजी बनसोडे, कार्याध्यक्ष लक्ष्मण क्षीरसागर, इंजी श्रीकांत फुलारी, फुलारी गुरुजी बाचोटीकर, माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड विजय धोंडगे,बाचोटीचे सरपंच बालाजी पाटील, उतम क्षीरसागर, युवा उद्योजक प्रशांत पातेवार, पोलिस उपनिरीक्षक सोनटक्के नांदेड, देगावचे पो.पा. सुभाष वळसे ,नांदेड जिल्हा न्यायालयीन संस्थेचे अध्यक्ष माधवराव झडीले, यांच्यासहित लोहा, कंधार,नांदेड,मुखेड, न्यायालयातील वकील, कर्मचारी, अधिकारी, मित्रमंडळी आदी उपस्थित होते.

यावेळी लोहयातील सुर्यवंशी परीवारांच्या वतीने मा. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी आनंदराव क्षीरसागर यांचा सहपत्निक लोहा शहरांच्या परंपरेनुसार खारिक खोबऱ्याचा हार घालून व कपडेरूपी भेट देऊन सत्कार केला. तसेच नांदेड जिल्हा न्यायालयीन संस्था व नातेवाईक मित्रमंडळी आदीनेआनंदराव क्षीरसागर यांचा सतपत्निक सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगरसेविका सौ. शोभाताई बगडे, उत्तमराव क्षीरसागर, तेली समाज संस्थेचे जिल्हाध्यक्ष बालाजी बनसोडे, आनंदराव क्षीरसागर यांच्या पत्नी, मुलगा,सुन,मुलगी आदींचे भाषणे झाली सर्वांनी आनंदराव क्षीरसागर यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच शेवटी आनंदराव क्षीरसागर यांचे भाषण झाले त्यांनी सत्काराला उत्तर दिले व सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमांचे प्रस्ताविक आकाश आनंदराव क्षीरसागर यांनी केले तर सुत्रसंचलन विक्रम कदम यांनी केले.

# कारखेल खु येथील सेवानिवृत्त आदर्श शिक्षक जगन्नाथ घुले गुरूजी यांचे कार्य कौतुकास्पद



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

कारखेल खु ता आष्टी जि बीड येथील सेवानिवृत्त शिक्षक जगन्नाथ घुले गुरूजी व सौ. कुसुम जगन्नाथ घुले यांनी चार धाम यात्रा पूर्ण केल्या प्रित्यर्थ गंगापूजन सोहळा मौजे कारखेल खु येथे पार पडला असता आपण समाजाचे काही तरी देणं लागतो याची जाणीव ठेवून त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कारखेल खु व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,बर्डे वस्ती या शाळेला लाऊडस्पीकर (amplifier) व शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दप्तर दिले.तसेच कारखेल खु येथील अडबंगीनाथ विद्यालय यांना टेबल आणि श्रेया दिव्यांग विद्यालयास कोरडा शिधा व गावातील सभामंडपात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता म्हणून सभामंडपाचे काही काम अर्धवट राहिलेले असून ते पूर्ण करण्यासाठी ५००० रुपये रोख रक्कम दिल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. त्यांचे विशेष आभार शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र शेकडे,बाळासाहेब शिरसाठ,सुदर्शन घुले सर व विठोबा मुळे सर व गावातील,पंचक्रोशीतील नातेवाईक यांच्या कडून करण्यात येत आहे.

## शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या आष्टी 'ईदगाह मैदान' येथे

# ६मे रोजी होणाऱ्या सभेस युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हाव- युवा नेतृत्व सागर दादा दरेकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ सोमवार दिनांक ६ मे रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथील ईदगाह मैदान येथे मा शरदचंद्रजी पवार साहेब यांची जाहीर सभा होणार असून सर्वांनी या सभेस मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन युवा नेतृत्व रूक्षीकेश दरेकर यांनी केले आहे.बीड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी



संपूर्ण जिल्हा पिंजून काढला असून सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे.सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित आहे.खासदार प्रीतम मुंडे यांच्या दहा वर्षांच्या काळात बीड जिल्हाच्या ग्रामीण भागात कसल्याही प्रकारचा विकास झालेला दिसून येत नाही, तसेच जनसंपर्क नसल्यामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे.अहमदनगर बीड परळी रेल्वेचे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे रेल्वेचे स्वप्न आज ही अधुरेच राहिले असून सदरील रेल्वे ही अहमदनगर ते अमळनेर पर्यंत कधी येते तर कधी येत नाही.सदरील रेल्वे बीड व परळी पर्यंत कधी धावणार? का निवडणूक आली की रेल्वेचे गाजर दाखविले जाते.केंद्र सरकारच्या आरोग्यासाठी असलेल्या अनेक योजनांची अंमलबजावणी होत नसल्यामुळे रुग्णांची हॉस्पिटलमध्ये होणारे हेळसांड होत आहे.यामुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी आहे.केंद्र व राज्य सरकारमध्ये समन्वय नसल्यामुळे सर्वसामान्य जनतेला कोणताही लाभ मिळत नाही.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेले आश्वासन गोरगरीब शेतकरी,शेतमजूर यांना प्रत्येकी १५ लाख रुपये मिळणार ही घोषणा हवेतच विरुण गेली..!सध्या आष्टीचे तिन्ही आजी माजी आमदार विकासासाठी एकाच बाजूने असले तरी विकासाची गंगा कागदावरच असल्याचे दिसून येते.त्यामुळे आष्टी मतदार संघाचा विकास करण्यासाठी बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार साहेब,भूषणसिंह राजे होळकर यांची आष्टी येथे सोमवारी सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार आहे.या सभेस उपस्थित.महेबूब शेख आ.संदीप क्षीरसागर.जीवनराव गोरे.मा.आ सय्यद सलीम.मा आ साहेबराव दरेकर,मा आ उषा दराडे,मा आ पुथ्वीराज साठे,मा आ बदामराव पंडित,मा आ राजेंद्र जगताप,सुशीला मोराळे,बबन गिते,शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा),परमेश्वर सातपुते,अण्णासाहेब चौधरी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख,रवि ढोबळे,मिलींद आव्हाड मानव हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष,ाल इंडीया पँथर दिपक भाई केदार,डेमोक्ट्रीक पार्टी चे प्रदेश अध्यक्ष अजिंक्य भैय्या चांदणे,अहमद पठाण ड.किशोर मुळे,सुनील नाथ, अमोल तरटे,आप चे अशोक येडे ऑल इंडिया पँथर जिल्हा अध्यक्ष उपस्थित राहणार आहे.तसेच आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी,सर्वसामान्य नागरिक,शेतकरी,कष्टकरी तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन युवा नेतृत्व रूक्षीकेश दरेकर यांनी केले आहे.

# पाटोदा तालुक्यात महायुतीच्या उमेदवार यांच्या प्रचाराचा झंझावात

## मोठमोठे प्रकल्प जिल्ह्यात आणण्यासाठी पंकजाताईंना संसदेत पाठवा- आ. आजबे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

मागील कालावधीत बीड जिल्ह्याचा विकास करण्याचा मनापासून प्रयत्न केला आहे.यापुढेही जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाठी मी कटिबद्ध आहे त्यासाठी मला आपले बहुमूल्य मत द्या असे आवाहन माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी मतदारांना केले.त्याच बरोबर बीड जिल्ह्यात मोठमोठे प्रकल्प यावेत तसेच जिल्ह्याला हक्काचे पाणी मिळाले तर तर जिल्हा सुजलाम सुफलाम होईल त्यासाठी पंकजाताईंना मोठ्या मताधिक्याने संसदेत पाठवा असे आवाहन आ.बाळासाहेब आजबे यांनी केले.

महायुतीच्या बीड लोकसभा मतदार संघाच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ दि.५ मे रोजी पाटोदा तालुक्यात महायुतीच्या वतीने झंझावाती प्रचारार्थ दौरा आयोजित करण्यात आला होता.यावेळी पाटोदा तालुक्यातील घुमरा पारगाव, पाटोदा,चुंबळी फाटा,धनगर जवळका,पारनेर, कुसळंब, पिंपळवडी,अंमळनेर बावी, ब्रम्हनाथ येलंब गावांमध्ये प्रचार रॅली,कॉर्नर बैठका, कार्यकर्त्यांच्या बैठकांदरम्यान पंकजाताई मुंडे आणि आ. बाळासाहेब आजबे बोलत होते. यावेळी पुढे बोलतांना मुंडे म्हणाल्या की,मी पालकमंत्री असतांना जिल्ह्यात



अनेक विकासकामे केली.जलयुक्त शिवार,पिक विमा तसेच जिल्ह्यातील प्रत्येक काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून पक्या रस्त्यांना जोडण्याचे काम केले आहे.त्याच बरोबर खा. प्रीतमताई यांनी पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून अनेक रस्त्यांचे कामे केली आहेत. यापुढेही जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाठी मी कटिबद्ध आहे. त्यासाठी मला आपले बहुमूल्य मत द्या असे आवाहन माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी मतदारांना केले.यावेळी बोलतांना आ.बाळासाहेब आजबे म्हणाले की,लोकसभा हि निवडणुक देशाची दिशा ठरवणारी निवडणुक आहे. आपल्या जिल्ह्याचा प्रतिनिधी केंद्र सरकारच्या निर्णय प्रक्रियेत असवा.पंकजाताई मुंडे यांचे नेतृत्व सर्वसमावेशक आहे. जिल्ह्याचे विकासाचे प्रश्न संसदेत मांडून ते सोडून घेण्याची ताकद पंकजाताई यांच्यामध्ये आहे.केंद्रीय राजकारणात ताई गेल्या काही वर्षांपासून सक्रीय आहेत.त्यामुळे जिल्ह्यात मोठमोठे प्रकल्प आणण्याची त्यांची धमक असल्याने ताईंना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन आ. बाळासाहेब आजबे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर सतिष शिंदे,पाटोदा पंचायत समितीच्या माजी सभापती सुवर्णाताई लांबरुड, सोनवणे ताई,अजय दादा धोंडे,माजी जि. प.सदस्य शिवनाथ आप्पा पवार, किसन बापु पवार, संजय नवले, विजय गोल्हार, वाल्मीक तात्या निकाळजे, दिपक दादा घुमरे, बाळा बांगर,किरण बांगर, आप्पा राख,बाबुराव जाधव, सुभाष घुमरे,काकासाहेब शिंदे, भागवत येवले, बप्पासाहेब जाधव,अनुरथ दादा सानप, महेंद्र गर्जे, मधुकर गर्जे, गणेश भोसले, दादासाहेब घुमरे, पद्माकर घुमरे, गणेश कोकाटे, देविदास शेंडगे, गौतम सरोदे, सुभाष मुंडे, संपत बाप्पा घुमरे, सलीम चाऊस, शेख जावेद,मधुकर कोकाटे, नारायण नागरगोजे,बंडू सव्वाशे, बंटी तांबे,आनंद घुमरे,गणेश भोसले,रोहित ढेरे, लंवाडे साहेब, अश्रू आप्पा काळे सह मतदार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**झाडे लावा झाडे जगवा**

## चारोळी

ओठांनी कधीतरी गाणं गुणगुणावं
निसर्गाच्या खुशीत मस्त हरवून जावं
झुळझुळ झऱ्याचं पाणी ओंजळभर प्यावं
रिमझिम पावसात नखशिकांत भिजावं.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## नागपूरमधून गडकरींचा पराभव निशचित:राज्यातील 'इतक्या' जागा मविआ जिंकणार-विजय वडेट्टीवार

**कोल्हापूर**-महाराष्ट्रात महाविकास आघडीचा किमान ३८ जागांवर विजय होईल, असा विश्वास विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला आहे. तसेच विदर्भतील सर्व जागांवर आमचा विजय निश्चित असून नागपूरमधून नितीन गडकरी विजयी होणार नाही असे ते म्हणाले. कोल्हापूरमध्ये त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला आहे.देशात सत्तांतर होणार, तानाशाही, जुमलेबाज सरकार जाणार आहे. राज्यात एकतर्फी निवडणूक होताना दिसत आहे. संपूर्ण राज्यातील वातावरण हे महाविकास आघाडीच्या बाजूने झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात महाविकास आघाडीचे उमेदवार शाहू महाराज यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. शाहू महाराज यांनी निवडणूक लढावी, अशी आमची आणि कोल्हापूरकरांची इच्छा होती. ती त्यांनी मान्य केली. शाहू महाराज ५ लाख मतांनी निवडून येतील'', असे वडेट्टीवार म्हणाले.याशिवाय त्यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे.

# हातात तलवार घेऊन दहशत माजवणाऱ्या गावगुंडाचा आवळल्या मुसक्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

गावातील सामाजिक सलोखा बिघडविण्याच्या उद्देशाने हातात खुलेआम तलवारी सारख्या धारदार शस्त्राच प्रदर्शन करुन दहशत पसरण्यासाठी स्टंटबाजी करणाऱ्या व्यक्तीला सापळा रचून त्याच्या मुसक्या आवळण्याची दबंग कारवाई अंभोरा पोलिस ठाण्याचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी केली.

अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत घाटा पिंपरी गावातील एक इसम गावात दहशत करण्यासाठी सतत तलवार स्वतः जवळ बाळगून तलवारीचा धाक दाखवत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्या अनुषंगाने प्रभारी अधिकारी मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ भडके, पोलीस हवालदार बाबुराव तांदळे, पोलीस अंमलदार शिवदास केदार यांनी सापळा रचून त्यास पकडले असता त्याचे जवळ तलवार मिळून आल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याचेवर पोलीस स्टेशन अंभोरा गुरन ११८/२०२४ कलम ४/२५ आर्म ऍक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आसून पुढील तपास महिला पोलीस हवालदार सुवर्णा पालवे ह्या करीत आहेत. या अंभोरा पोलिसांनी केलेल्या दबंग कारवाईचे जनतेतून कौतुक होत आहे.



# अमेरिका-चीन संबंधांचे शीतयुद्ध

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री ब्लिंकन हे गेल्या आठवड्यात चीनचा दौरा करून परतले. या दौऱ्यात त्यांनी चीनचे परराष्ट्रमंत्री आणि अध्यक्ष व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. महिन्याच्या सुरुवातीला अमेरिकेच्या वित्तमंत्री जॅनेट येलेन यांनीही चीनला भेट देऊन अनेक विषयांवर चर्चा केली. मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे सॅन फ्रान्सिस्को येथे अध्यक्ष जो बायडेन यांना भेटले होते. त्यानंतर दोन्ही देशांतील वरिष्ठ सैनिक आणि इतर अधिकाऱ्यांच्या भेटी, वार्ताविनिमय वाढलेले दिसतात; परंतु बहुतांश विषयाच्या वादांवर काहीच सहमती दिसत नाही. वर्षाअखेर जर डोनाल्ड ट्रम्प हे अध्यक्षपदी निवडून आले तर अमेरिका-चीन यांच्यातील संबंध अधिक जटिल होण्याची शक्यता आहे.सन २०२२पासून सुरू असलेल्या युक्रेन युद्धात आता रशियाचे पारडे जड होत आहे. हमास-इस्त्रायल युद्धाची रणधुमाळी अद्याप चालू आहे आणि गाझा पट्टीतील नागरिकांचे हाल वाढत असून त्यांना तूर्त दिलासाची आशा नाही. भर घालायला वर्षाच्या सुरुवातीला तैवान येथील अध्यक्षीय आणि सार्वत्रिक निवडणूकीत चीनला विरोध करणारे अध्यक्ष आणि पक्ष निवडून आल्याने तेथील तणाव कायम आहे. दक्षिण चीन उपसागरात चीनने आक्रमक धोरण चालू ठेवले असून चीन व फिलिपाइन्स यांच्यातील मतभेदाला नवीन वाचा फुटली आहे. प्रत्येक घटनेत अमेरिका आणि चीन विरोधी पक्षांना मदत पुरवत आहेत. याशिवाय अमेरिकेने चीनकडून होणाऱ्या आयातीवर निर्बंध लागू करून चीनला अत्याधुनिक तंत्रज्ञान निर्यात करण्यावर बंदी केली आहे. अमेरिकेचे म्हणणे आहे की, चीन त्यांच्याकडून आयात केलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून अमेरिकी उत्पादनांशी स्पर्धा करत आहे ज्याचा विपरित परिणाम अमेरिकेच्या उद्यमांवर आणि अनुषंगाने रोजगारांवर होत आहे.रशियाने केलेल्या आक्रमणाचा सुरुवातीला अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांच्या मदतीने युक्रेनने चांगला प्रतिकार केला. परंतु अखेर रशियाच्या सामर्थ्यापुढे युक्रेनला हळूहळ झुकावे लागले आहे. मागील वर्षी हमासने इस्त्रायलवर गाझा पट्टीतून हल्ला करून सुरुवातीला यश मिळवले व त्याच्या प्रतिकारात इस्त्रायलला अमेरिकासह इतर मित्रदेशांनी अटीतटीची मदत केली. साहजिक युक्रेनला मिळणारी पाश्चिमात्य मदत घटली. दुसरीकडे चीनने रशियाला आधुनिक शस्त्रसामग्रीचा पुरवठा सुरू केला व त्याच्या बदली खनिज तेलाची स्वस्त दरावर आयात सुरू केली. आज रशिया आणि चीन यांच्यातील मैत्री आणि व्यापार वाढत आहे. याच्यात आक्षेपार्ह काहीच नाही. रशियाच्या खनिज तेलावर निर्बंध असले तरी नियमांत पळवाट काढून भारतही तेल आयात करतो व आपल्या पश्चिमी तटावरील रिफायनरीत प्रक्रिया करून पाश्चिमात्य देशांना निर्यात करतो. रशिया आणि चीन यांच्या मैत्रीतील आक्षेपार्ह पैलू म्हणजे रशियाची इराणला होणारी मदत; ज्यात इराणच्या आण्विक प्रकल्पाला पाश्चिमात्य निर्बंध डावलून मदत होत असल्याचा आरोप केला जातो.तिकडे, इतके महिने वेगवेगळ्या प्रकारची अत्याधुनिक शस्त्रसामग्री वापरून गाझा पट्टी जमीनदोस्त केल्यानंतर आणि तेथील नागरिकांचे जीवन असह्य करूनही इस्त्रायल हमासचे अस्तित्व मिटवण्यात अपयशी ठरले आहे. इस्त्रायलने आता जगाची सहानुभूती गमावली असून उलट युद्धक्षेत्राचा विस्तार वाढत आहे. लेबनॉनस्थित हेजबुल्लाह, सीरीया आणि इराकमध्ये आश्रय घेतलेले आयएसचे दहशतवादी, पर्शियन आखातात सक्रीय असलेले येमेनमधील हुथी बंडखोर हे इराणचे शत्रू. या पार्श्वभूमीवर एप्रिलच्या सुरुवातीला इस्त्रायलने दमास्कसमधील इराणच्या दूतावासातील एक इमारत नष्ट केली. त्यात इराणच्या रेव्होल्युशनरी गार्डच्या अल-कुद्स या दहशतवाद्यांच्या कारवायांचे समन्वय करण्याच्या संस्थेचे वरिष्ठ सैनिकी अधिकारी ठार झाले. परराष्ट्र संबंधांचे शिष्टाचार आणि कूटनीतिक अधिकारांचे यात उल्लंघन झाले. इराणने याचा प्रतिकार करत इस्त्रायलवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन यांचा हल्ला केला. संरक्षणासाठी इस्त्रायलला अमेरिका, ब्रिटन आणि (अरब) जॉर्डनची मदत घ्यावी लागली. इराणने तूर्त प्रकरण वाढू दिले नाही परंतु असे धाडस करण्यामागे त्यांचा सुरक्षेने वेढलेला आण्विक प्रकल्प आहे. पश्चिम आशियात इस्त्रायल आणि इराण अघोषित अणुसत्ता आहेत. इस्त्रायलला पाश्चिमात्य देशांचा पाठिंबा, तर इराणला रशिया आणि (काहींच्या मते) चीनचाही पाठिंबा आहे. अमेरिका चीनवर निर्बंध लावून वरिष्ठ स्तरावर करीत असलेल्या वाटाघाटींमागे हे महत्त्वाचे कारण आहे.आशिया-प्रशांत सागर क्षेत्रातील समस्या वेगळी आहे. तैवान हा चीनचा अविभाज्य भाग आहे, ही चीनची पहिल्यापासून भूमिका आहे. अमेरिकेने तैवानला संरक्षणाची हमी दिली आहे. दक्षिण चीन उपसागरात चीनने उभारलेली कृत्रिम बेटे आणि रहदारी करण्यावर लावलेले निर्बंध अमेरिका आणि मित्रदेश पाळत नाही. अमेरिकेच्या बलाढ्य विमानवाहक युद्धनौका आणि त्यांच्या संरक्षक काफिल्यांवर सशस्त्र कारवाईची क्षमता अजूनतरी चीनकडे नाही. मात्र, असे करणे हे अमेरिकेचे आपल्या सार्वभौमत्वावर अतिक्रमण आहे, ही चीनची जुनी तक्रार आहे. करोनाची साथ आटोक्यात ठेवण्यासाठी चीनने केलेल्या कडक आणि अवाजवी उपायांमुळे त्या देशाची अर्थव्यवस्था तुलनेने क्षीण झाली. त्याचे वेगळेच सामजिक आणि आर्थिक परिणाम सामान्य नागरिकांना आजही सोसावे लागत आहेत.

# मॉर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीज!

अमेरिकेच्या सरकारने या शोधाचे हक्क विकत घेण्यास नकार दिल्यावर मॉर्स यांनी स्वतःची कंपनी स्थापन केली. तारायंत्राचा प्रसार लवकरच झपाट्याने वाढला व बहुतेक देशांनी त्याचा वापर करण्यास सुरुवात केली. तथापि लगेचच मॉर्स यांच्यावर त्यांचे भागीदार व प्रतिस्पर्धी संशोधक यांनी शोधाच्या अधिकाराबाबत दावे लावले. अतिशय खर्चिक न्यायालयीन खटल्यांचा दीर्घ मालिकेनंतर इ.स.१८५४ साली अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मॉर्स यांचा एकस्व अधिकार मान्य केला. अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले.

मॉर्स- मोर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीझ हे अमेरिकन चित्रकार व विद्युत चुंबकीय तारायंत्राचे जनक होत. मॉर्स यांचा जन्म दि.२७ एप्रिल १७७१ रोजी चार्ल्सटाऊन- मॅसॅचूसेट्स येथे झाला. त्यांचे शिक्षण अँडोव्हर येथील फिलिप्स कॅडमीत व पुढे येल कॉलेज येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्याकाळी फारसे आकलन न झालेल्या विद्युत या विषयावरील व्याख्यानामुळे त्यांना गोडी निर्माण झाली. त्याच वेळी त्यांना लघू व्यक्तिचित्रे काढण्याचा छंद जडला. तथापि त्यांच्या वडिलांना त्यांचा हा छंद पसंत नव्हता. सन १८१०मध्ये पदवी संपादन केल्यावर त्यांनी बॉस्टन येथील एका ग्रंथ प्रकाशकाकडे कारकुनाची नोकरी पत्करली. त्या काळचे प्रख्यात अमेरिकन चित्रकार वॉशिंग्टन ऑल्स्टन व गिल्बर्ट स्टूअर्ट यांनी मॉर्स यांच्या चित्रकलेच्या व्यासंगाला प्रोत्साहन दिले. सन १८११ साली ऑल्स्टन यांचे विद्यार्थी म्हणून ते इंग्लंडला चित्रकलेच्या अभ्यासासाठी गेले. तेथील त्या कलेच्या वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक शैलीचा- दंतकथा व ऐतिहासिक घटना यांच्या अद्भूत चित्रणाचा त्यांनी स्वीकार केला. तथापि १८१५ मध्ये ते अमेरिकेला परतले तेव्हा अमेरिकन लोकांना त्यांच्या ऐतिहासिक चित्रांत रस नाही, असे त्यांना दिसून आले. त्यामुळे नाइलाजाने त्यांना अर्थार्जनासाठी व्यक्तिचित्रे रंगविण्याचा व्यवसाय पुन्हा पत्करावा लागला. त्यांनी न्यू इंग्लंड, न्यूयॉर्क व द.कॅरोलायना या राज्यांत 'फिरते चित्रकार' म्हणून सुरुवात केली. इ.स. १८२५नंतर न्यूयॉर्क शहरात स्थायिक झाल्यावर त्यांनी काही अप्रतिम व्यक्तिचित्रे रंगवली. त्यांतील मार्क्विस दी लाफायेत यांची दोन व्यक्तिचित्रे विशेष उल्लेखनीय आहेत.

इ.स.१८१७मध्ये त्यांनी आपले धाकटे बंधू सिडनी एडवर्ड्स मॉर्स यांच्या समवेत पंपासंबंधीची तीन एकस्वे- पेटंटे मिळविली होती. संगमरवरावर कोरीव काम करण्याचे एक यंत्र त्यांनी सन १८२३मध्ये विकसित केले. त्यानंतर विद्युत विषयक प्रयोगांत त्यांनी सातत्याने विशेष रस घेतला. सन १८३२मध्ये फ्रान्सहून जहाजातून परत येतानाच्या प्रवासात चार्लस टी.जॅक्सन यांनी मॉर्स यांना लांब अंतरावर विद्युत प्रेषण करणारे व फ्रान्समध्ये मिळवलेले एक उपकरण दाखविले. यामुळे मॉर्स यांना विद्युत व तारायंत्र या विषयांत अधिक स्वारस्य निर्माण झाले. पुढील तीन वर्षे त्यांनी अनेक प्रयोग करून सन १८३५मध्ये पहिले विद्युत चुंबकीय तारायंत्र उपकरण केले. यात एक विद्युत मंडल चालू व बंद करून संकेत प्रेषण करणारा प्रेषक, संकेतांची नोंद करणारा विद्युत चुंबकीय ग्राही आणि संकेतांचे अक्षरे व संख्या यात रूपांतर करणारी सांकेतिक लिपी यांचा समावेश होता. त्यांनी योजलेली ठिपके- डॉट्स व प्रास- डॅशेस यांवर आधारलेली सांकेतिक लिपी अद्यापही त्यांच्या नावाने ओळखली जाते. ज्यात कट्ट व कड या दोन ध्वनींच्या साहाय्याने ठिपका व प्रास दर्शविले जातात. पुढे त्यांनी अधिक लांब अंतरावर संदेश पाठविण्यासाठी विद्युत चुंबकीय अभिचलित्रांच्या प्रणालीचा शोध लावला. त्यांच्या शोधाच्या विकासात त्यांना एल.डी.गेल व जोझेफ हेन्री यांचे तांत्रिक साहाय्य आणि ल्फ्रेड व्हेल यांचे आर्थिक साहाय्य लाभले. मॉर्स यांनी सन १८३७मध्ये आपल्या शोधाच्या एकस्वाकरिता अर्ज केला, परंतु त्यांना आपल्या शोधाला मान्यता मिळवण्यास जवळजवळ सात वर्षे वाट पहावी लागली. शेवटी सन १८४३मध्ये अमेरिकेच्या काँग्रेसने वॉशिंग्टन ते बाल्टिमोर यांच्या दरम्यान तारयंत्राद्वारे प्रायोगिक संदेशवहन प्रस्थापित करण्यासाठी तीस हजार डॉलरचे अनुदान मंजूर केले. दि.२४ मे १८४४ रोजी या योजनेद्वारे पहिला संदेश प्रेषित करण्यात आला.

मॉर्स यांच्यात नेतृत्वाचेही गुण होते. रंगभूमीवरील स्वैराचार विरुद्ध मोहीम उघडण्याचा एक भाग म्हणून त्यांनी सन १८२७मध्ये न्यूयॉर्क येथे जर्नल ऑफ कॉमर्स हे रंगभूमीसंबंधीच्या जाहिराती स्वीकारण्यास नकार देणारे नियकालिक स्थापन करण्यास मदत केली. चित्रकारांना मदत करण्यासाठी व अमेरिकन जनतेची कलाविषयक अभिरुची उंचावण्यासाठी नॅशनल कॅडेमी ऑफ डिझाइन या सन १८२६मध्ये स्थापन झालेल्या संस्थेचे ते एक संस्थापक व पहिले अध्यक्षही होते. सन १८३२-३६ या काळात त्यांनी नेटिव्ह अमेरिकन चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. तिच्यातर्फे न्यूयॉर्क शहराच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणूनही ते उभे राहिले होते. परंतु राजकारणातील त्यांचा सहभाग अयशस्वी ठरला. सन १९२२मध्ये ते युरोपला गेले आणि तेथे अभ्यास, प्रवास व चित्ररेखाटन यांत तीन वर्षे त्यांनी खर्च केली. सन १८३२मध्ये अमेरिकेला परतल्यावर न्यूयॉर्क विद्यापीठात चित्रकला व शिल्पकला या विषयांच्या प्राध्यापकपदावर त्यांची नेमणूक झाली. पुढे तेथेच ते संकल्प चित्रकलेच्या वाङ्‌मयाचे प्राध्यापक झाले होते.

मॉर्स यांचे देहावसान वयाच्या ९९व्या वर्षी न्यूयॉर्क येथे दि.२ एप्रिल १८७२ रोजी झाले. त्यांच्या मृत्यूनंतर तारायंत्राचे जनक ही त्यांची कीर्ती दूरध्वनी, रेडिओ व दूरचित्रवाणी यांच्या शोधामुळे पुसट होत गेली, तथापि चित्रकार म्हणून त्यांची ख्याती मात्र वाढली आहे. त्यांची व्यक्तिचित्रे जगातील अनेक संग्रहालयांत प्रदर्शित केली गेलेली आहेत. त्यांचे तारायंत्र उपकरण वॉशिंग्टन येथील नॅशनल म्युझियम ऑफ हिस्टरी अँड टेक्नॉलॉजी या संग्रहालयात जतन करून ठेवण्यात आले आहे.

!! जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या लोकोपयोगी संशोधनास विनम्र अभिवादन !!

# गाडी सावकाश चालवू: गावी सुखरूप पोहचू!

आज प्रत्येकाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताना दिसतात, की सद्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणूनच की काय? आजचा युवकवर्ग पुढच्यास ओलांडून त्याच्या कितीतरी पुढे निघून जाण्याच्या नादात- ओव्हर टेक करण्याच्या प्रयत्नात सदासर्वकाळ दिसून येतो. यातच तो आनंद मानतो, हेच आपले ध्येय समजतो. मग तो जीवनमार्ग असू द्या किंवा वर्दळीचा राष्ट्रीयमार्ग तथा आंतरराष्ट्रीय महामार्ग असू द्या. आपलाच एक बांधव आहे, आपल्यासारखाच एक मानव आहे, अशी कदाचित त्याला कल्पना किंवा बुद्धीच उमगत नसावी. असे ते ओव्हर टेकचे भयान नाट्य बघून वाटते. बरं, एकाने ओव्हर टेक केले, म्हणून दुसरा तरी शांत व आपल्या चालीने- वेगाने मार्गक्रमण असतो का? नाही. त्याला पण चेव येतो, त्याची तीव्रपणे चेतना जागृत होते. मग तो चिडून त्वेषाने इरेस पेटतो आणि आपणही त्याला मागे पाडावे, म्हणून तो गाडी अतिवेगान दामटू लागतो. कारण हम भी किसीसे कम नही! हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून सदैव सैनिका पुढेच जायचे! या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. किंवा नुसतीच त्याला मिरवायचे असते की आपण किती कार्यतत्पर आहोत. आपली कामाची उरक लोकांच्या डोळ्यांत त्वरेने भरण्याची घाई त्याला झालेली असते. जशी आपल्याकडे झाडीबोलीतील एक म्हण प्रसिद्ध आहे तशी-

येलपाडीचे (मिजासखोर स्त्रीचे) आले डोळे।
खाटले ठेवून खाल्या लोळे।।

ज्ञानवंतांनी भुकेल्या, तहानलेल्या, अधाशी, हपापलेल्या व्यक्तीस पुढ्यात घेऊन त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. त्याच्यासारखेच ज्ञानवंतही करू लागले तर त्यांच्यातील फरकच कळणार नाही. म्हणून ज्ञानवंतांनी संयम, सबुरी व धीरानेच अशा प्रसंगाना सामोरे जाणे इष्ट ठरते. एकदा एका बाइकस्वाराने ओव्हर टेक केला. तेव्हा मागे पडलेला बाइकस्वार त्वेषाने पेटून उठला व बाइक वेगात दामटली. अतिवेगामुळे वळणावर ती घसरली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर जोरात आपटली. तिचा चेंदामेंदा झाला, तर बाइकस्वाराने मात्र या जगाचा कायमचा निरोप घेतला. दुसरी एक घटना अशी, की चार चाकी कारला एका बाइकस्वार युवकाने ओव्हर टेक करून मागे टाकले आणि तो शहरातील मुख्य चौकात येऊन काहीतरी खरेदी करू लागला. तेवढ्यात ती कार येऊन पोहोचली. कारचालक युवती त्याला आडवी झाली. मला ओव्हर टेक करण्याची तुझी हिंमतच कशी झाली? म्हणत आधी त्याच्या गालांगालावर मोजले आणि मग त्याला चांगलेच बदडून काढले. असा आपल्याला ओव्हर टेक केल्याचा वचपा, बदला घेतला. किती मोठ्ठा आनंद, परमानंद झाला असेल तिला! नाही काहो? तरीही बिच्चारा युवक शांतच! अशा या भानगडी विनाकारण जीवावर बेतत असतात. तरीही ओव्हर टेकर्सना यात काहीच कशी लाज-शरम वाटत नाही? ईश्वरप्राती करून ब्रह्मानंद प्राप्तीसाठी अशी तातडी, असे साधकांना ओव्हर टेक करणारे महाभाग मात्र क्वचितच दृष्टीस पडतात. कारण या आध्यात्मिक, भक्तिमार्गावर चालणारा लंगडालुळा होत नाही तर त्याचा थेट पुनर्जन्मच होतो, एक खरा भला माणूस म्हणूनच!

समजा, आपली एखादी मूल्यवान वस्तू घरातच कुठेतरी हरवली. ती जोपर्यंत आपल्या दृष्टीस पडत नाही तोपर्यंत मनास चैन पडेल तर शप्पथ! ती शोधण्यासाठी आपण एका पाठोपाठ एक साधन वापरतो. कधी काठीने, कधी झाडूने ओढून, ढकलून वा चाचपडून बघतो. तर कधी विजेरीचा प्रकाशझोत टाकून डोळे फाडफाडून पाहतो. ती वस्तू सांपडत नाही, तोवर शोध घेणे आपण थांबवित नाही. सहज एखादे सद्गृहस्थ यावे आणि वस्तू उचलून तुम्ही शोधत आहात ते हेच का? असे उच्चारताच आपली उत्सुकता शिगेला पोहोचते. झटकन ती वस्तू हातात घेऊन तिला निरखून बघतो आणि मोठ्या आनंदाने खड्या आवाज म्हणतो, अहो, ती हीच माझी अमोलक वस्तू! मी हीलाच शोधत होतो. असे म्हणून आपण पूर्वीप्रमाणे ती वस्तू शोधत राहाल का? नाही. आधी त्या दात्या व्यक्तीस अनेक नमस्कार घालतो, धन्यवाद देऊन त्याचे स्तुतीपाठ गातो. आजीवन ऋणी व उपकृत राहण्याचे बोलून दाखवितो व वचनबद्ध होतो. आपण परत त्याच वस्तूचा शोध सुरूच ठेवला, तर लोक आपल्याला नक्कीच मूर्ख ठरवतील. मात्र त्या वस्तूची स्वच्छता, सुरक्षा, सुशोभन, कलाकुसर, काळजी आदी वेळोंवेळी चालवित असतो. अगदी असेच ब्रह्मानंद व इश्वरप्राप्तीस केल्या जाणाऱ्या भक्ती वा पुजापाठाचे आहे. विचारा, कसे? तर आपण पुजापाठ कशासाठी करतो? त्यामागील उद्देश साफ-स्पष्ट असावा लागतो. ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद मिळवावे, असा उद्देश असेल तर वरील दृष्टांत तंतोतंत लागू पडतो. त्यासाठीच आपण पुजापाठ, जप, तप, योगयाग करत असतो. परंतु अनेक शोध शोधांती एखादा ब्रह्मवेत्ता सद्गुरू मिळाला आणि त्याने ब्रह्मदर्शन घडवून दिले. तर मग परत तसलेच पुजापाठ करत बसणे योग्य राहील का? नाही ना! म्हणून मग केवळ ईश्वरास आमरण प्रसन्न ठेवण्यासाठी सद्गुरूच्या आदेश व वचनांचे पालन करत त्यालाच आपण सदैव हसतमुख ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे सर्वश्रूत आहे, हीच खऱ्या ब्रह्मानंदप्राप्त साधकांची परंपरा आहे. आपण जिथून सुरूवात केली होती, तिथे थांबून सांगावेसे वाटते, की ओव्हर टेक करणारास पुढे जाऊ द्या, पण मागे पडणाराने अजिबात चालाखी करू नये. पुढे जाणारास पुढ्यात घेऊन त्याच्या यशस्वीतेबद्दल सहकार्य द्यावे, यामुळे काय होईल? तर वाईट प्रसंग वा अप्रिय घटना अजिबात उद्धवणार नाही. वादंग वा हिंसाचाराला आपणच ब्रेक लावू शकाल, एवढे मात्र निश्चित! यात तुम्हाला जो आनंद मिळेल; तो खरोखरच ब्रह्मानंद असेल..!

## जागतिक हास्य दिन

लोकनेता न्युज नेटवर्क

हास्य दिनी आज । हार्दिक शुभेच्छा ।।
मनस्वी सदिच्छा । सर्वांनाच ।।

पाच मे चोवीस । हास्य दिन आज ।
हास्याचा हा साज । चर्येवर ।।

हासता हासता । वाटावा आनंद ।
हास्याचा हा छंद । जोपासावा ।।

सकारात्मकता । वृद्धी भावनेत ।
दुःखावर मात । हास्यानेच ।।

असे जीवनात । तणाव नि चिंता ।
तया होई चिता । हास्यानेच ।।

कार्य करताना । मेंदुचे थकणे ।
हास्य वदनाने । कार्यरत ।।

निरोगी आरोग्य । पाणी नि आहार ।
हास्याचा आधार । आवश्यक ।।

निरोगी मनाचा । एक उपचार ।
सुखाचा संसार । जीवनात ।।

हास्य वदनाने । बदले स्वभाव ।
आनंदाचा भाव । चर्येवर ।।

मोठ्याने हसून । व्हावे दुःखमुक्त ।
व्हावे सुखयुक्त । जीवनात ।।

ताजे नि तवाणे । शरीर नि मन ।
आनंदी जीवन । हसण्याने ।।

आनंद देणाऱ्या । हार्मोनचा जन्म ।
सुखाचाच जन्म । जीवनात ।।

सुखासाठी आज । सर्वांनी हसावे ।
हसून जगावे । सर्वांनीच ।।अभंगकार

**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले**
**रुक्मिणी नगर,अमरावती**

## नर्तन कला ..

नृत्यांगना नाचतात
करी अश्लील चाळे
भुवयांची हालचाल
टाकी मोहाचे जाळे

कमरकरे अदाकारी
अंग प्रत्यंगास जाळे
भेदूनि जाते गर्दीला
मादक मदन डोळे

विस्पारुनि न्याहाळे
पहात राहती भोळे
करे उत्तान प्रदर्शन
डोळे कपड्या खिळे

सभ्यता कुठे हरली
बोचत राहती खिळे
शिष्टाचार लुप्त पावे
मुर्दाड बनले सगळे

मनात लपली इच्छा
विकृत आनंद मिळे
बिघडत जाते पिढी
खोलवर रुतली मुळे

कुणीलपून पाहतात
मनात काळे कावळे
समाजात फिरताना
शुभ्र सभ्यता बगळे

नर्तन कला निर्मळता
गढूळ जला विरघळे
विचीत्रवळण कलेला
आसवे सहज ओघळे

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६..**

# कोटीच्या कोटी उड्डाणे!

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनाचा पुन्हा एकदा विक्रम झाला आहे. यावेळचा विक्रम अधिक महत्त्वाचा; याचे कारण एप्रिल महिन्यातील जीएसटीचे संकलन दोन लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडून पुढे गेले आहे. सात वर्षांपूर्वी जीएसटी लागू झाला तेव्हा पहिल्या वर्षी सरासरी मासिक संकलन ८२ हजार कोटी रुपये होते. यावरून जीएसटीने किती मोठी मजल मारली आहे, याचा अंदाज यावा. निवडणुकांचा माहोल असल्याने एप्रिलमधील विक्रमी जीएसटी संकलन सत्ताधाऱ्यांना सुखावणारे आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या प्रतिक्रियेवरूनही याचा अंदाज येतो. त्यांच्या मते, या जीएसटी संकलनामध्ये अर्थव्यवस्थेच्या सक्षमतेचे प्रतिबिंब पडले आहे. हे काही प्रमाणात खरे आहे. याचे कारण, इतक्या मोठ्या प्रमाणात व्यवहार, खरेदी-विक्री, उत्पादन, आर्थिक देव-घेव झाल्याशिवाय करसंकलन वाढणार नाही. जीएसटीचे एकूण संकलन वाढणे, याचाच अर्थ त्यातील राज्यांच्या वाट्याला येणारी रक्कमही वाढणे. त्यामुळे, या आकड्यांवर राज्येही खूष असणार, यात शंका नाही. मात्र, केवळ या मोठ्या आकड्यावर भाळून देशातील करप्रणाली, एकूण अर्थव्यवस्था आणि जीएसटीचे वर्तमान व भविष्य यांच्याबाबत नि:शंक व आश्वस्त राहायचे का, याचा विचार होणे आवश्यक आहे. मुळात, सध्या जीएसटीचे चार प्रकारचे दर आहेत. पाच, १२, १८ आणि २८ टक्के. ही करआकारणी कितीतरी जास्त आहे. विजेवर चालणाऱ्या अनेक ग्राहकोपयोगी वस्तू १८ टक्क्यांच्या वर्गवारीत येतात. तसे म्हटले तर पाचनंतरचे तीनही टप्पे हे वस्तू आणि सेवांवर भरपूर कर आकारणी करणारे आहेत. केंद्र सरकारने केवळ तिजोरीतील जीएसटीचा ओघ कसा वाढतो आहे; यावर समाधान न मानता जीएसटी करांची फेररचना करण्याची गरज आहे. संपूर्ण देशाची एकच बाजारपेठ आणि दुहेरी कर आकारणीपासून सुटका, असे जीएसटीचे मूलभूत तत्त्व असले तरी देशाच्या अर्थकारणाचा गाडा प्रामुख्याने ज्या पेट्रोलियम पदार्थांच्या किंमतींवर चालतो; ते या करजाळ्यात येतच नाहीत. आज पेट्रोल किंवा डिझेल यांची आयात किंमत आणि ग्राहकांना मोजावी लागणारी किंमत यांच्यात जी प्रचंड तफावत आहे; त्याचे मुख्य कारण त्यावरचे कर हेच आहे. केंद्र आणि सर्व राज्य सरकारांना या करांतून मोठा निधी मिळत असतो. पेट्रोल व डिझेल यांच्यावरील करसंकलनात या सरकारच्या काळात पाचशे टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. मग सरकारने जी इच्छाशक्ती जीएसटी आणताना दाखविली; तीच इच्छाशक्ती दाखवून पेट्रोल, डिझेल, इंधनवायू यांनाही जीएसटीत का आणू नये? अर्थमंत्री सीतारामन या 'पेट्रोल व डिझेल जीएसटीमध्ये आणण्यास आपला विरोध नाही...' असे म्हणत असतात. पण सर्व राज्यांचे यावर एकमत होणार नाही, हे त्यांना माहीत आहे. याचे कारण, हा उत्पन्नाचा मोठाच स्त्रोत आहे. मात्र, पेट्रोल व डिझेल जीएसटीमध्ये आले तर चलनवाढीला आळा बसून एकूण अर्थकारणाला किती मोठी चालना मिळू शकेल, याचे अनेक अभ्यास प्रकाशित झाले आहेत. जीएसटीचे जाळे असे विस्तारले तर ग्राहकोपयोगी छोट्या छोट्या वस्तूंवरचा जीएसटीचा बोजाही सरकारला कमी करता येईल. अप्रत्यक्ष कर हा नेहमीच 'सब घोडे बारा टक्के' असे म्हणत समाजातील दुर्बळांची क्रयशक्ती तुलनेने कमी करीत असतो. महिन्याला २० हजार रुपये मिळविणाऱ्यांनी साबण किंवा डिटर्जंटवर १२ टक्के जीएसटी भरणे आणि दोन लाख मिळवणाऱ्यांनीही तितकाच भरणे; यातून या अप्रत्यक्ष कररचनेतील विषमतेचे स्वरूप लक्षात येईल. मात्र, अशी विषमता दूर करण्यासाठी प्रत्यक्ष कराची - विशेषत: प्राप्तिकराची - वसुली प्रामाणिकपणे आणि जाळे विस्तृत करून करावी लागते. आपली करप्रणाली यात सातत्याने कमी पडते आहे. प्रत्यक्ष करांची वसुली अर्थकारणाच्या प्रमाणात होत नसल्याने जीएसटीचा प्रचंड बोजा आज सामान्य ग्राहकांवर पडतो आहे. सरकार सक्तीने करीत असलेली धान्यखरेदी (लेव्ही) हीदेखील साजरी करायची गोष्ट आहे; असा विपरीत संस्कार इथल्या शेतकऱ्यांवर होता. तशीच गत जीएसटीच्या वाढत्या आकड्यांनी आनंदी होणाऱ्या सामान्य नागरिकांची होऊ नये. जीएसटी व्यवस्थेत दुहेरी कर आकारणी पूर्णपणे संपलेली नाही. तसेच, व्यावसायिक, उद्योजकांना जीएसटीचा परतावाही वेळेत व वेगाने मिळतोच, असे नाही. अनेकदा त्यांचा व्यवहार सफल होत नाही; कर मात्र आधीच कापून गेलेला असतो. जीएसटी ही फार मोठी कर सुधारणा आहे, यात शंकाच नाही. सात वर्षांपूर्वी ती करून मोदी सरकारने धाडसी, आवश्यक पाऊल टाकले. पण गेल्या काही काळात जीएसटीच्या वाढत्या संकलनावरच सरकार खूष दिसते आहे. तिजोरीत इतका प्रचंड पैसा नियमित व बिनबोभाट येऊन पडणे कोणत्या राज्यकर्त्यांना आवडणार नाही? मात्र, आता जीएसटीचे जाळे विस्तारणे, काही वस्तूंवरील करांची टक्केवारी कमी करणे आणि करसंकलन व परताव्यात अधिक पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. करसंकलनाचे विक्रम होणे याचा अर्थ करपद्धती निर्दोष, सर्वजनहिताची झाली, असे नाही.

# शब्दांचा सातबारा 'आम्ही रानातली फुले'

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**


विद्या दौलत सरपाते यांचा ' आम्ही रानातली फुले' हा अतिशय देखणा कविता संग्रह प्रकाशनापूर्वी हाती आला. एकुण ६८ कवितांचा हा कविता संग्रह आहे. 'भावनांना शब्दांच कोंदण' हे ब्रिदवाक्य घेऊन परिस प्रकाशन पुणे यांनी हा कविता संग्रह प्रकाशित केला आहे.

अँड. डॉ विजयकुमार कस्तुरे यांनी ' मातीतून आलेली कविता' असा आपल्या सुंदर सहज व अर्थपूर्ण प्रस्तावनेने आपण भारावून जातो व कविता संग्रहाची शेवटची कविता वाचेपर्यंत खाली ठेवत नाही.कविताच आपलं बोट धरून सारा आसमंत फिरवते आणि आपल्या बालपणीच हरवलेल शेती- मातीच नात पुन्हा घट्ट करते नंदू वानखडे या चित्रकाराने सुंदर व आशयगर्भ मुखपृष्ठ व रेखाटने कविता संग्रहास 'चार चांद' लावतात. विद्या सरपाते यांचा हा दुसरा कविता संग्रह आहे. ओघवती भाषा व लयबद्ध शब्दरचना कुठेही शब्दांची ओढातान न करता सोपी कविता लिहिणे अवघड आहे.

त्याचा कुठेही गवगवा न करता अतिशय शांत व विवेकी लेखन आणि दुःखाचे भांडवल न करता ही कविता आपल्याला प्रश्न विचारत राहते.

कवयित्री कविता लिहित नाही त्या निर्माण होतात. कविता ही अंतःकरणाला समृद्ध करते असं सांगत मा.सुरेश निंबाजी येरमुले यांनी या कविता संग्रहाची पाठराखण केली आहे.

अनेक शब्द कवितेत अस्सल ग्रामीण आहेत. उदा.धुऱ्यावर, बावणकशी मखरात, कोथळी,हुळा, शेकोटी, घोळ, शितोड्याच्या कलहान, झुलू खजूर फांदीला,माहेरच्या पिंपळाला,धांदोट्या, झुंजूमुंजू, ढोल्या, टाकसाळ, निळ्या काजळीचा कंदील, आऊतपिट्या, चिल्लेपिल्ले, डोंब,बिनगी, काळजाच्या कपारीत, बोंडरोंड,सपनाची उतरंड,काटशेवरीच्या खाली, सकवार अंग,अशी व अनेक शब्द आपल्याला एकामागून एक धक्के देत राहतात आणि म्हणूनच डॉ विजयकुमार कस्तुरे यांची प्रस्तावना सार्थ ठरते.पान नं३४ वरचीआऊतपिट्या हा शब्द खूप भाव खाऊन गेला. माझ्या वाचण्यात




न आलेला,उड्या मारती ठेंगडे असा तो ही तसाच

कविता संग्रह उघडताच आपल्या आजोबाला अर्पण केलेला हा संग्रह आहे. त्यांच्या मुळेच हा शब्दाचा सातबारा माझ्या कडे आला असं कवयित्री म्हणते.पण कोणताही 'बोजा' नसलेला हा एकुलता एक सातबारा आहे.

कवयित्रीच निरीक्षण अतिशय बोलके आहे. ती आपल्या 'माय' या कवितेत म्हणते

'सासरच्या सुपामध्ये
माहेरच निसायची'

कवयित्रीला कोणताच विषय वर्ज नाही

बाभूळ ही कविता चेतनागुणोक्ती अलंकाराच उत्तम उदाहरण आहे.

बोटातल्या जोडव्याची
छनछन भारी गं
ऐकण्यास कडूलिंब
उभा तिच्या दारी गं

संस्कार या कवितेत कवयित्री आपलं बालपण मांडताना

नदीकाठी फिरायचो
ढोराबरोबर मीही दिसभर चरायचो
दूधभाकरीसम येळणीत
आनंदाला चुरायचो

प्रस्थापित व्यवस्थेला कंटाळून कवयित्री शेवटी मायला विचारते सांग माय काय लिहू?

तिने विचारलेले प्रश्न मनाचा तळ ढवळून काढतात.

झूल या कवितेत कवयित्री म्हणते

अंगावर झूल
झूलीखाली वळ
वाटे चळवळ
उभारावी
फिरव नांगर कर मशागत
पिकव मनात माणुसकी

माणुसकी टिकवण्यासाठी मनाची मशागत करण्याचा सल्ला कवयित्री देते.

या संग्रहातील सुंदर आणि आशयगर्भ कविता आपलं लक्ष वेधून घेते. ती म्हणजे पान नं ५५ वरची मुक्त विद्यापीठ

माय मुक्त विद्यापीठ
बाप त्याचा कुलगुरू
जगण्याच्या संघर्षाची
होते शिकवणी सुरु

कवयित्री विद्या दौलत सरपाते हे कवितेच्या क्षेत्रातील एक आश्वासक व मराठी कवितेत मोलाची भर घालणारे नाव आहे. या कविता संग्रहास शुभेच्छा देऊन थांबतो.

**डॉ बबनराव महामुने**
**हिवराआश्रम**

# सांगोल्याच्या हक्काचे पाणी अकलूजकरांसह बारामतीकरांनी पळवले-आ.शहाजीबापू पाटील

## पाणी आणणाऱ्या खा.रणजितसिंह निंबाळकरांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

अकलूजकरांसह बारामतीकरांनी सांगोला तालुक्याच्या हक्काचे पाणी पळवून तालुका दुष्काळाच्या खाईत लोटला. शेतीच्या पाण्याच्या बाबतीत शरद पवारांसह मोहिते पाटील यांनी कायमच सांगोला तालुक्यावर अन्याय केला आहे. मात्र, विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी बारामतीकरांशी दोन हात करून सांगोला तालुक्याला हक्काचे पाणी मिळवून दिले. सांगोला तालुक्यात हरितक्रांती होण्यासाठी दुष्काळी भागाला पाणी वळवणारा खासदार म्हणून रणजितसिंह निंबाळकर यांना प्रंचड मतांनी विजयी करावे, असे आवाहन आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आमदार.



शहाजीबापू पाटील व माजी आमदार दीपकआबा साळुंखे- पाटील यांच्या नेतृत्वाखाली सांगोला तालुक्यात गावभेट दौरा संपन्न झाला. कमलापूर, अनकढाळ, राजुरी, उदन वाडी, पाचेगाव, ह.मंगेवाडी, जुजारपूर, हातीद, सोमेवाडी, बुद्धेहाळ, गौडवाडी या गावात गावभेट दौरा करून मतदारांशी संवाद साधला. त्यानंतर जुनोनी येथे जाहीर सभा संपन्न झाली. यावेळी माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, अकलूजकरांसह बारामतीकरांनी शेतीच्या पाण्याबाबत सांगोला तालुक्यावर अन्याय केल्याची भावना शेतकऱ्यांच्या मनात आजही आहे. त्यामुळे सांगोल्याचं पाणी पळवणाऱ्या पवारांसह मोहिते पाटलांनी जनतेची दिशाभूल करू नये. गेल्या पाच वर्षांत शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्याचे आवर्तन चांगल्या प्रकारे मिळाल्याने लोकसभा निवडणुकीत पाणीप्रश्न टर्निंग पॉईट ठरला आहे. सांगोल्याच्या हक्काचे बारामतीकरांनी पळवून नेलेले पाणी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी पुन्हा हे पाणी दुष्काळी भागाला वळवले आहे. तालुक्यासाठी वरदायिनी ठरलेल्या टेंभू योजनेचा विस्तार करून अधिकचे दोन टीएमसी पाणी तालुक्याला मिळाले आहे. ऐन उन्हाळ्यात शेतीचा तसेच जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी टेंभू योजनेतून माण नदीत पाणी सोडले आहे. शरद पवारांनी सांगोला तालुक्याचा पाणीप्रश्न कायमस्वरुपी मिटवू अशी मावळत्या सूर्याला साक्ष मानून शपथ घेतली होती. मात्र, शरद पवार आणि मोहिते पाटील यांना पाणीप्रश्न सोडविण्यात सपशेल अपयश आले. विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी शेतकऱ्यांच्या शेतात पाणी आणल्याने त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.

# सांगोला पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी सिद्धेश्वर नागटिळक यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला पंचायत समिती येथे कार्यरत असलेले कृषी विस्तार अधिकारी सिद्धेश्वर जनार्धन नागटिळक हे मंगळवार दि.३० एप्रिल २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले . सेवानिवृत्ती निमित्त सिद्धेश्वर नागटिळक यांचा सत्कार सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर साहेब, गटविकास अधिकारी आनंद लोकरे साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच यावेळी सांगोला तालुका ग्रामसेवक संघटने तर्फे सन्मान करण्यात आला.यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी मिलिंद सावंत,उप अभियंता ठोंबरे साहेब, बालविकास प्रकल्प अधिकारी मोलाणे साहेब, कृषी अधिकारी दिपाली शेंडे, विस्तार अधिकारी प्रतिभा पवार, विस्तार अधिकारी वसंत फुले ,अमोल तोडकरी, अभिजीत पवार ,सर्व विस्तार अधिकारी , स.ले.अ.आनंद जाधव ,कक्ष अधिकारी स्वामी साहेब, महेश जाधव ,नागणे साहेब, अंगणवाडी पर्यवेक्षिका, ग्रामसेवक संघटना पदाधिकारी शहाजीराव इंगोले, बाळू शिंदे, राजकुमार ताटे, खान साहेब मुलाणी, तसेच सर्व ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी,तसेच कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. सिद्धेश्वर नागटिळक यांनी एकूण ३४ वर्ष ४ महिने नोकरी केली. सांगोला पंचायत समिती येथे १३ वर्ष कामकाज पाहिले .तर माळशिरस पंचायत समिती येथे ग्रामसेवक , ग्रामविकास अधिकारी पदावर १९ वर्ष व कृषी विस्तार अधिकारी पदावर २ वर्ष ४ महिने त्यांचा सेवा कार्यकाल आहे. तसेच त्यांना २०१८.१९ मध्ये जिल्हा परिषदेचा कृषिमित्र पुरस्कार प्राप्त झालेला आहे.सत्कारास उत्तर देताना त्यांनी सांगितले की , सांगोला पंचायत समिती येथे काम करीत असताना जिल्ह्याचे सर्व पदाधिकारी, अधिकारी ,तसेच सांगोला तालुक्यातील सर्व पदाधिकारी सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी ,शेतकरी बांधव ,ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांच्या सहकार्यामुळेच या पदावर प्रामाणिकपणे काम करू शकलो. त्याबद्दल सर्वांचे त्यांनी आभार व्यक्त केले. तसेच सत्कारप्रसंगी मान्यवरांनी त्यांचा सत्कार करीत त्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# अभिषेक काळे यांची श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या चरणी गायन सेवा

## श्री स्वामी समर्थ देवस्थान अक्कलकोट जपत आहे आध्यात्मिक सांस्कृतिक परंपरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या १४६ व्या पुण्यतिथी निमित्ताने आयोजित धर्मसंकीर्तन सोहळ्यात ख्यातनाम गायक श्री.अभिषेक काळे सांगली यांची अप्रतिम गायन सेवा स्वामी समर्थ महाराजांच्या चरणी समर्पित झाली.सुरुवातीला श्री स्वामी समर्थ देवस्थान वतीने प्रथमेश महेश इंगळे,सचिव श्री.आत्माराम घाटगे, विश्वस्त श्री महेश गोगी, व्यवस्थापक श्रीशैल गवंडी यांच्या शुभहस्ते सर्वं कलाकारांचे सत्कार करण्यात आले.त्यानंतर ओंकार पाठक यांनी प्रास्ताविक करत सांगितले की श्री स्वामी महाराजांच्या इच्छेनुसार गेली अनेक वर्षे धर्मसंकीर्तनात नामवंत कलाकारांची संगीत सेवा, कीर्तन, प्रवचन सेवा कार्यक्रम होतात.त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली.सुरुवातीला गणेश वंदना सुर निरागस हो या गाण्याने करत कानडा राजा पंढरीचा,माझे माहेर पंढरी,भाग्यदा लक्ष्मी बारंम्मा.निघालो घेऊन दत्ताची पालखी,काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल,अशा अनेक संतरचना गाऊन स्वामी भक्तांना मंत्रमुग्ध केले शेवटी येरे कृष्णा तिरीच्या वसणाऱ्या व स्वामी समर्थ गजराने अभंगरंगाची सांगता केली.त्यांना तितकीच अप्रतिम दमदार साथसंगत हार्मोनियम ओंकार पाठक तबला विवेक पोतदार पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे टाळ अक्षय सरदेशमुख यांनी केली.यावेळी अनेक स्वामी भक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.धर्मसंकीर्तनात अनेक नामवंत मंडळी स्वामींची सेवा करण्यासाठी धन्यता मानतात.आणि श्री स्वामी समर्थ देवस्थान अतिशय सुंदर आयोजन नियोजन करत हा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्याची परंपरा कायम राखत आहे.

## संग्रामसिंह जाधवराव यांच्या मार्गदर्शनाखाली

# महायुतीचे उमेदवार खा.रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारास मतदार नागरिकांचा, उस्फुर्त प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

४३ माढा लोकसभा मतदारसंघाचे भाजप, शिवसेना , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ,आरपीआय (आठवले गट) ,रासप, रयत क्रांती संघटना या पक्षांच्या महायुतीचे उमेदवार खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सांगोला शहरातील लक्ष्मीनगर, मिरज रोड ,विजयनगर, शिवाजीनगर, रेल्वे लाईन-पूर्व पश्चिम बाजू, दत्तनगर, कर्मवीर नगर, शिक्षक कॉलनी, ब्रह्मचैतन्य नगर ,वासुद रोड ,सदानंद नगर ,अलराईन नगर ,कडलास नाका परिसर या ठिकाणी महायुतीचे, पदाधिकारी कार्यकर्ते यांनी होम टू होम प्रचार केला . संग्रामसिंह जाधवराव यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला शहरात जोरदारपणे प्रचार मोहीम सुरू आहे. .खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना निवडून आणण्यासाठी कमळ चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रचारकांनी केले आहे . प्रचारकांच्या प्रचारास मतदार नागरिकाकडून



उस्फुर्तपणे प्रतिसाद मिळत आहे

माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार, खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना माढा लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा निवडून आणण्यासाठी मतदारांनी खा .खासदारांची नाईक निंबाळकर यांना विजयी करून देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना पुन्हा संधी देण्यासाठी कमळाला मतदान करावे असे आवाहन महायुतीचे पदाधिकारी ,कार्यकर्ते यांनी केले आहे . तालुक्यातील शेती सिंचनाच्या अपूर्ण योजना इतर विकासाच्या योजना व कामे पूर्ण करण्यासाठी खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना पुनश्च एकदा सेवा करण्याची संधी देण्यासाठी त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन प्रचारा दरम्यान करण्यात येत आहे.

सांगोला शहरातील या प्रचार दौऱ्यामध्ये माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा राणीताई माने ,मा.गटनेते तथा नगरसेवक आनंदाभाऊ माने, मा. नगराध्यक्ष नवनाथभाऊ पवार, मा. नगराध्यक्ष अनिलभाऊ खडतरे ,मा,नगरसेविका छायाताई मेटकरी, उद्योगपती आनंद घोंगडे, मा . नगरसेवक अस्मिर तांबोळी, मा. नगरसेवक सचिन लोखंडे,मा. नगरसेवक सोमेश यावलकर मा.नगरसेवक प्रा. संजय देशमुख नगरसेवक माऊली तेली चेअरमन लतिका मोटे, चेअरमन शोभाताई देशमुख, नितीन करने.प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिलिंग गावडे, चेअरमन प्रभाकर घोंगडे,शहराध्यक्ष प्रवीण जानकर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस आनंद फाटे, सुनील पवार, जय बनसोडे, श्रीनाथ बिडकर ,शिवाजी गावडे ,ज्ञानेश्वर गाडेकर, आनंद बनसोडे, वल्लभ चव्हाण, प्रवीण गावडे, आयुब जमादार, प्रमोद जाधव, ऋषी जानकर, युवा नेते काशिलिंग गाडेकर, अरुण पाटील, लखन पवार, नितीन काळे , चैतन्य राऊत, सचिन शिर्के, राहुल गेजगे, शहीद मुलाणी,अमर इंगोले, राजू शिंदे, रोहित शिर्के, प्रसाद शिर्के, गणेश करे, मोहसीन शेख, औदुंबर शिर्के, रियाज तांबोळी, संतोष लवटे, ,दीपक कोरे, , रेशमा मुजावर, अनुराधा माने, सुवर्णा जाधव ,अश्विनी दोलतडे,, सुमित कोल्हे ,सुवर्णा गडदे, करिश्मा मुजावर, ललिता खाडे , फर्जाना मुजावर, अरुणा माने, रुकसाना मुजावर, शोभा जाधव, मनीषा दहिवडकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री गणेश क्लीनिक व डॉ.बोराडे लॅबोरेटरी सेंटर तर्फे आरोग्य तपासणी शिबीर व मोफत रक्त तपासणी शिबीर एस.टी.कर्मचाऱ्यांसाठी संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त सांगोला एस. टी. स्टँड येथे सर्व एस. टी. कर्मचाऱ्यांसाठी श्री गणेश क्लीनिक कडलास नाका, सांगोला व डॉ. बोराडे लॅबोरेटरी सेंटर, सांगोला तर्फे बुधवार दि. ०१/०५/२२४ रोजी सकाळी १०:०० वा. मोफत आरोग्य तपासणी शिबीर व मोफत रक्तातील साखरचे प्रमाण, रक्त गट तपासणी शिबीराचे दत्त मंदिर, एस टी आगार सांगोला येथे आयोजन करण्यात आले होते.श्री गणेश क्लिनिक चे डॉ.अजित धायगुडे, डॉ.अहिल्या धायगुडे, डॉ.बोराडे लॅबोरेटरी सेंटर, सांगोला चे डॉ. प्रमोद बोराडे, सौ.विद्या भारत गरंडे ,सौ.मनीषा जाधव मॅडम, श्रीकांत नवले, विवेक सावंत, श्री.धर्मराज बोराडे, प्रा भारत गरंडे ,श्री.दशरथ गरंडे, श्री.यश दादासाहेब सरगर यांच्यासह आगार व्यवस्थापक श्री. विकास पोफळे, स्थानक प्रमुख श्री. सागर कदम, कार्यशाळा प्रमुख श्री. विकास पारसे, श्री समाधान काशीद, समीर मणेरी, ज्योतीराम पुकळे, प्रशांत चंदनशिवे, आशिष सूर्यवंशी, उत्तम बुरुंगले यांच्यासह सर्व पर्यवेक्षक व कर्मचारी उपस्थित होते.



# कंधार तालुका व परिसरात तापमानाने केला कहर

## नागरिकांनो वाढत्या तापमानात उष्माघातापासून बचावासाठी आरोग्याची काळजी घ्या-डॉ.पेठकर लक्ष्मीकांत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार सूर्य आग ओकू लागला आहे,कंधार तालुका व परिसरात तापमानाने कहर केला असून,सध्या उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कमाल तापमानात दैनंदिन वाढ होत आहे.त्यामुळे उष्माघातापासून बचाव करण्यासाठी उन्हाळ्यात आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे आवाहन डॉ.पेठकर लक्ष्मीकांत यांनी केले आहे.

उष्माघात टाळण्यासाठी हे करा, दुपारी १२ ते ३ या वेळेमध्ये घराबाहेर पडू नये.घराबाहेर पडताना डोक्याला पांढरे शुभ्र सुती रुमाल अथवा टोपी चा वापर करावा,कष्टाची कामे सकाळी तसेच सायंकाळी ५:०० च्या नंतर करावीत,

देशात सर्वाधिक तापमानाची नोंद मराठवाड्यातील नांदेड शहरासह जिल्ह्यात नोंदवली गेली आहे.दि.४ मे २०२४ रोज शनिवारी दुपारी १:३० ते ३:०० च्या नोंदीनुसार कंधार शहरांचे तापमान ४२.८३ डिग्री सेल्सिअस होते.

कंधारकर नागरिक मागील १० ते १२ दिवसांपासून वाढत्या उष्णतेच्या झळांनी होरपळून निघत आहेत.सरासरी ४१ ते ४२ डिग्री सेल्ससीअस तापमानाची नोंद झाली असून. शनिवारी तर तापमानाचा कहर झाला. दुपारी १:०० ते २:३० वाजता ४२.अंश सेल्सिअस मध्ये तापमानाची नोंद झाली आहे.हे आतापर्यंतचे सर्वाधिक तापमान होते, एवढेच काय देशातील सर्वाधिक तापमान म्हणून मराठवाड्यातील नांदेड शहरासह जिल्ह्यात तापमानाची नोंद झाल्याचे सांगण्यात आले.



वाढत्या उन्हापासून स्वतःला जपावे.काळजी घ्यावी, असे आवाहन आई क्लिनिक विकासनगर कंधार येथील डॉ.पेठकर लक्ष्मीकांत यांनी उष्माघात टाळण्यासाठी खालील,माहिती माध्यमांना दिली आहे.

**उन्हापासून संरक्षणासाठी या करा उपाययोजना काय करावे**

उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडीओ, टि.व्ही. किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा.

तहान लागलेली नसली तरीसुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे.

हलकी, पातळ व सूती कपडे वापरावेत. बाहेर जातांना गॉगल्स,छत्री, हॅट,बुट व चपलाचा वापर करण्यात यावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत घ्यावी,



जर आपण बाहेर उन्हात काम करीत असाल तर हॅट किंवा छत्रीचा वापर करण्यात यावा.तसेच ओल्या कपडयांनी डोके,मान,चेहरा झाकण्यात यावा.

शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होत असल्याने ओ.आर.एस.घरी बनविण्यात आलेली लस्सी. तोरणी, लिंबू-पाणी, ताक इत्यादींचा वापर नियमित करण्यात यावा.

अशक्तपणा,स्थूळपणा,डोकेदुख,सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.

गुरांना छावणीत ठेवण्यात यावे.तसेच त्यांना पुरेसे पाणी पिण्यास देण्यात यावे.

घर थंड ठेवण्यासाठी पडदे,शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा.

पंखे, ओले कपडे यांचा वापर करण्यात यावा.तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे.

कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.

सूर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळणसाठी कामगारांना सुचित करण्यात यावे.

पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा.

गरोदर महिला कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घेण्यात यावी.

**काय करू नये**

लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये.

दुपारी १२ ते ४ या कालावधीत बाहेर उन्हात जाण्याचे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे.

बाहेर तापमान जास्त असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत. तसेच दुपारी १२ ते ४ या कालावधीत बाहेर काम करण्याचे टाळावे.

उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे.(तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावीत.)

शरीरात पाण्याचे प्रमाण कमी करण्यास कारणीभूत असलेले चहा, कॉफी, मद्य व कार्बोनेटेड थंड पेय इत्यादींचा वापर टाळावा.

उच्च प्रथिने असलेले अन्न टाळावे,व शिळे अन्न खाऊ नये.

# विद्यार्थ्यांच्या निट परीक्षेसोबत पालकांची अग्निपरीक्षा-डॉ.ढवळे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोड


दि.५ रविवार रोजी निटपरीक्षा असल्याने परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी जावे लागते.काही विद्यार्थ्यांना अगदी जिल्ह्याच्या शेवटचे टोक असणा-या तालुक्यातील ठिकाणी दोन अडिच तासांचा प्रवास करून जावे लागते. आर्थिक सक्षमता असलेले पालक स्वतःच्या अथवा खाजगी वाहनांद्वारे परीक्षेच्या ठिकाणी पोहचतात.आर्थिक स्थिती मजबूत नसलेल्या पालकांनी विद्यार्थ्यांना एसटीने प्रवास करत परीक्षाकेंद्राच्या ठिकाणी अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.त्यातही असणारी परीक्षा केंद्रे शहरापासून ६-७ किलोमीटर शहराच्या बाहेर आहेत.त्याठिकाणी साधे पिण्याच्या पाण्याची सुद्धा सोय नाही.सकाळी ११ वाजता गेटच्या आतमध्ये सोडणा-या विद्यार्थ्यांचा पेपर दुपारी २ ते सायं ५ वाजुन २० मिनिटापर्यंत आहे.सकाळी ७-८ वाजता घरून थोडं फार खाऊन निघालेल्या विद्यार्थ्यांनी सकाळी ११ ते सायं साडे ५ तास उपाशीपोटी परीक्षा द्यायची. बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नाहकत्रास सहन करावा लागत असुन तालुक्यातील विद्यार्थ्यांना तालुक्याच्या ठिकाणी परीक्षा केंद्राची व्यवस्था केली तर निदान त्यांचे हाल होणार नाहीत. यावर्षी तिव्र उन्हाळा असल्याने उष्माघाताचा त्रास परीक्षार्थींना होऊ शकतो याची काळजी शिक्षण विभागाने घेणे गरजेचे आहे अशी प्रतिक्रिया पालकवर्गामधुन व्यक्त होत आहे.

# ज्ञानदर्शन गुरुकुल श्रीक्षेत्र संतकृपा हनुमानगड सावरगांव (घाट) येथे अनाथ व ऊसतोड कामगारांच्या मुलांना मोफत प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

ज्ञानदर्शन गुरुकुल श्रीक्षेत्र संतकृपा हनुमानगड सावरगांव (घाट) येथे अनाथ व ऊसतोड कामगारांच्या मुलांना मोफत प्रवेश दि. १५ जुन २०२४ पर्यन्त देण्यात येणार आहेत ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक निवासी वस्तीगृह व ज्ञानदर्शन अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे.अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालणारी संस्था आहे अध्यात्म आणि विज्ञान यांची प्रशिक्षण देण्यासाठी ज्ञान दर्शन गुरुकुल या नावाची संस्था स्थापन केली आहे महाराष्ट्र राज्य मुख्यतः भक्ती प्रधान राज्य आहे आपल्या पुढच्या येणाऱ्या पिढीला भगवत भक्तीचा वारसा लाभावा हा मुख्य हेतू जोपासण्याचा संकल्पनेतूनच ज्ञान दर्शन गुरुकुल या संस्थेची उभारणी करण्यात आले आहे कारण आज जर तरुण पिढी कडे पाहिले तर तरुण हा व्यसनाधीन झालेला पाहताना दिसतो तरुण पिढी व बाल अवस्थेत होणारे चुकीचे संस्कार थांबवण्यासाठी अध्यात्म व शिक्षण ही काळाची गरज आहे म्हणून तरुण पिढी पुढच्या काळामध्ये संस्कृती सिल दिसावी आजची मुलं म्हणजे उद्याचे देशाचे नेतृत्व आहे म्हणून आपला मुलगा सुशिक्षित करण्यासाठी पालकांची धडपड आहे पण सुशिक्षित होणे जेवढे महत्त्वाचे तेवढेच संस्काराकडे सुद्धा लक्ष देणे अत्यावश्यक आहे प्रत्येक पालकांची आपला मुलगा मुलगी सुशिक्षित व सुसंस्कारित व्हावा ही प्रबळ इच्छा असते ते प्रत्येक पालकाची इच्छा ज्ञान दर्शन गुरुकुलच्या माध्यमातून पूर्ण होईल शिक्षणासोबत जर आपल्या मुलाला संस्कार लावायचे असतील तर सर्व माता-पित्यांनी आपल्या मुलाचा प्रवेश ज्ञान दर्शन गुरुकुल मध्ये प्रवेश घ्यावा शिक्षण व संस्कार या दोन गुणांनी आपला मुलगा तयार व्हावा असे वाटत असेल तर ज्ञान दर्शन गुरुकुल मध्ये मोफत प्रवेश घेऊन सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री.ह.भ.प.महंत अभिमन्यू




महाराज शास्त्री (अध्यक्ष ज्ञान दर्शन गुरुकुल श्री क्षेत्र संतकृपा हनुमान गड सावरगाव (घाट) यांनी केले आहे. गुरुकुल अभ्यासक्रमात हनुमान चालीसा, हरिपाठ, श्रीमदभगवतगीता, ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा, योगाभ्यास, संगीत शिक्षण, मृदंग वादन, तबला वादन, कीर्तन, प्रवचन, व्याख्यान शैली प्रशिक्षण व संगणकीय ज्ञान स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिकवले जाईल अध्यात्मिक शिक्षण व शालेय शिक्षण विद्यार्थ्यांकडून उत्तम रीतीने करून घेतले जाईल गुरुकुल चे दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ सराव,७ ते ७.३० गुरुकुल सामुदायिक प्रार्थना , ७.३० ते ८ नाष्टा,८ ते ९ मृदंग क्लास,९ ते १० गायन क्लास , १० ते ४ शाळा,५ ते ६ हरिपाठ, ७ ते ८ सायंकाळचे भोजन, ८.३० ते १० शालेय अभ्यास व विश्रांती प्रत्येक शनिवार व रविवार मृदंग व गुरुकुल अभ्यासक्रमाचे पाठ होतील प्रत्येक पौर्णिमेला हरिकीर्तन होईल.ज्ञानेश्वरी, गाथा, गीता,कीर्तन, व्याख्यान,संगीत शिक्षण,मृदंग वादन,प्रवचन,व्याख्यान या विषयासाठी अनुभवी शिक्षक वृंद विषयानुसार राहतील तरी अनाथ विद्यार्थ्यांनी व ऊसतोड कामगारांच्या मुलांनी व पालकांनी ज्ञानदर्शन गुरुकुल श्री क्षेत्र संतकृपा हनुमानगड गड सावरगाव येथे भेट देऊन मोफत प्रवेश निश्चित करावा असे आवाहन श्री.ह.भ.प.महंत अभिमन्यू महाराज शास्त्री ( अध्यक्ष ज्ञान दर्शन गुरुकुल श्री क्षेत्र संतकृपा हनुमान गड सावरगाव (घाट) यांनी केले आहे.

# केंद्र( खुर्द )येथील जल जीवन मिशन अंतर्गत होत असलेले काम संथ गतीने होत असल्याने गावकऱ्यांना करावा लागत आहे पाण्याचा सामना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

सेनगाव तालुक्यातील केंद्रा (खुर्द) येथे गेल्या काही महिन्यांपासून जल जीवन मिशन अंतर्गत हर घर जल घर घर जल अशी संकल्पना महाराष्ट्रात शासनाने अमलात आणली असून या योजनेचा नागरिकांना कोणताच फायदा होत नसल्याने नागरिकांना व महिलांना अक्षरशः डोक्यावर पाणी आणावे लागत आहे केंद्रा खु येथील जलजीवन मिशन अंतर्गत होत असलेल्या कामांचे शासनाच्या नियमाप्रमाणे १८ महिने पूर्ण होऊन देखील गावाला पाण्याची वाट पहावी लागत आहे जलजीवन मिशनची विहीर कोरडी गेल्याने शासनाकडून नवीन



विहिरीचा प्रस्ताव करावा लागत असतो परंतु या गावांमध्ये कुठला प्रस्ताव केला नसून गावकऱ्यावर आता डोक्यावर पाणी आणण्याची वेळ या गुत्तेदार इंजिनियर यांच्यामुळे आली आहे आता तरी शासन यावर गांभीर्याने लक्ष घालून दखल घेईल का असे गावकऱ्याकडून बोलले जात आहे

या जलजीवन मिशन अंतर्गत चे काम देखील संथ गतीने होत असल्याने नागरिकांना नाहकचा त्रास सहन करावा लागत आहे केंद्रा (खुर्द) येथील जलजीवन अंतर्गत होत असलेल्या कामांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असून इस्टिमेट प्रमाणे कुठल्याच बाबीची अंमलबजावणी झाली नाही केंद्रा खु येथील रहिवासी सांगत आहेत अशा भ्रष्टाचारांना शासनाने कामे देऊ नाही असे देखील नागरिक यावेळी बोलतात तरी शासनाने केंद्रा खुर्द येथील होत असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत कामाची चौकशी करून गुत्तेदारावर कारवाई करण्याची मागणी होत आहे,

# आदर्श विद्यालयात वार्षिक आढावा बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर ,आदर्श कॉन्व्हेंट ज्ञानपीठ व आदर्श जुनियर कॉलेज या तिन्ही शाळेची वार्षिक आढावा बैठक दिनांक ४ मे रोजी संपन्न उत्साहात संपन्न झाली.

सर्वप्रथम माता सरस्वती देवीचे पूजन व वंदना करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे रुमाल व पुष्पगुच्छदेऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री अशोकभाऊ कोटेचा संचालक शिप्रम , प्रमुख अतिथी श्री प्रेमराजजी भाला सचिव शिप्रम , संचालक श्री सहदेवजी सुरडकर, श्री अरविंदजी शिंगणे , स्थानिक सल्लागार श्री अनंतरावजी खेकाळे, श्री छगनदादा मेहेत्रे, श्री काशिनाथराव भालेराव , निरीक्षण समिती सदस्य श्री सुभाष फटिंग सर, श्री एस एम भालेराव सर, संस्थेचे




पर्यवेक्षक श्री मंगेश तांबट शाळेचे मुख्याध्यापक श्री सुभाष मोरे सर , कॉन्व्हेन्टच्या मुख्याध्यापिका सौ. शीतल बोंद्रे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती .

सदर बैठकीमध्ये सचिव श्री प्रेमराजजी भाला यांनी शाळेच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक असणारे नाविन्य पूर्ण उपक्रम, जयंती पुणयतिथी, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध शिष्यवृत्ती योजना यांचा सखोल आढावा घेऊन मार्गदर्शन केले. शेवटी अध्यक्षीय भाषणात श्री अशोक भाऊ कोटेचा म्हणाले की , सर्व शिक्षक अथक परिश्रम करून विद्यार्थ्यांना घडवीत आहात असेच सर्व कर्तव्य पार पाडून शाळेचे नावलौकिक वाढवावे. सूत्रसंचालन कु. वैष्णवी मंडईकर मॅडम व आभार केदार मॅडम यांनी मानले.

# मार्केट कमिटीच्या नोटीसीला उद्योगपती कडून नॉट रिस्पॉनस

## कायदा मोठा की पैशाचा जोर ?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

धर्माबाद मार्केट कमिटीच्या जागेत असलेल्या प्लॉट वर शेतकऱ्यांचा माल खरेदी विक्री करण्यासाठी भले मोठे भूखंडाचे प्लॉट घेऊन त्यात नियम डावलून इतर पोट भाडेकरू ठेवणाऱ्या उद्योगपती ला मार्केट कमिटीच्या वतीने दिनांक १० एप्रिल रोजी नोटीस दीली आणि तीन दिवसांत त्यावर आपले म्हणणे सादर करा असे नमूद केले.एकूण तीन आठवडे उलटले पण त्यावर कोणतेही उत्तर आले नाही. त्यामुळे मार्केट कमिटीच्या नोटीस ला नॉट रिस्पॉन्स ठेवणाऱ्या उद्योगपती संदर्भात काय करवाई होते हे आगामी काळात कळणार आहे कायद्या मोठा की त्यापेक्षा पैशाचा जोर मोठा हे पाहणे आता महत्वाचे झाले आहे.

मार्केट कमिटीने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक असताना ही पोट भाडेकरू ठेऊन जास्तीचे भाडे वसूल करण्या करीता नियम पायदळी तुडवने आणि आलेल्या नोटीसला समाधान कारक उतर न देणे आतपर्यंतचा हा प्रकार पाहता दाल में कुच्छ तो गडबड है असेच दिसत आहे.

तीन दिवसात खुलासा सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली आणि तीन आठवडे उलटले पण मार्केट कमिटीच्या वतीने देखील हालचाली गतिमान होण्याऐवजी उलट त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे पाहता धनदांडगे उद्योगपती हे प्रकार दाबून टाकण्यात यशस्वी होतील का असे वाटत आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधान हे न्यायाचे प्रतीक आहे.त्यामुळे मार्केट कमिटीने कायद्यापेक्षा स्वतःला मोठे समजून नियम मोडीत काढण्याचा घडलेला प्रकार हाणून पाडून कायद्याचा धाक राहील अशी धडाकेबाज कारवाई करून कायद्याचा सन्मान ठेवावा अशी प्रतिक्रीया सुज्ञ नागरिकांतून व्यक्त केली जात आहे .



छत्रपती संभाजी नगर येथे साहित्यधारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आयोजित बुद्ध जयंती उत्सव - चलो बुद्ध की ओर संमेलनात मानवधिकारंचे वृत्त देशभर पोहचवण्याचे काम उत्कृष्टपने पार पडल्या बद्दल एक तरुण निर्भिड दै. लोकनेता संपादक या नात्याने सत्कार करतांना आयोजक डॉ. संघर्ष सावळे व मंचावरील उपस्थित मान्यवर. (छाया :- लोकनेता न्युज नेटवर्क छ. संभाजी नगर)

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904